PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 2

# वाङ्मयेतिहासलेखनविशयक दृष्टीकोन व अपेक्षा

**श्री वैजिनाथ राख**
शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडगाव बु पुणे ४६
महाराष्ट्र भारत

वाङ्मयनिर्मिती ही त्या समाजाची सामाजिक व सांस्कृतिक निर्मिती असते. वाङ्मयेतिहास हा त्या समाजाच्या प्रज्ञेचा इतिहास असतो असे रा. श्री. जोग म्हणतात. वाङ्मयामध्ये त्या त्या समाजाच्या धारणा—प्रेरणा—प्रवृत्ती यांचा काही प्रमाणात संगम झालेला दिसतो त्यामुळे वाङ्मयेतिहासलेखन करणे म्हणजे त्या समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक प्रकारे लेखन करण्यासारखे आहे. द. दि. पुंडे म्हणतात त्याप्रमाणे, ''वाङ्मयेतिहासामध्ये केवळ ग्रंथ व ग्रंथकारांचा विचार करून न थांबता एकूण वाङ्मयव्यावहारांचा विचार करावयाचा असतो''[१] म्हणजे यात वाङ्मयासंबंधी सर्व गोष्टींचा समावेश होतो. वाङ्मयीन चळवळी, सामाजिक स्थित्यंतरे, वाङ्मयनिर्मितींची साधने व सर्व घटक, वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा, प्रवृती यांचा वेध वाङ्मयेतिहासात घेतलेला दिसतो.

वाङ्मयेतिहासकाराने स्वीकारलेल्या दृष्टिकोनाचा विचार करावयाचा म्हटले, तर असे म्हणता येईल की, आजच्या आपल्या व्यामिश्र जीवनपद्धतीत वाङ्मयाबाबतच्या आपल्या अनेक धारणा आहेत. वाङ्मयाकडून आपल्या काही अपेक्षा आहेत. या धारणांना, अपेक्षांना केंद्रस्थानी ठेवून काही तत्त्व, काही निकष, काही संकल्पना निश्चित कराव्या लागतील आणि त्यांच्या आधारे वाङ्मयेतिहासकाराला आपला दृष्टिकोन बनवणे शक्य होईल. याच कारणामुळे वेगवेगळ्या दृष्टिकोनांनुसार वेगवेगळे वाङ्मयेतिहास लिहिले जाणे शक्य आहे.[१] ''एक मात्र निश्चित, की वाङ्मयेतिहासकाराने स्वीकारलेला दृष्टिकोन कोणताही असला, तरी त्याची दृष्टी मात्र समग्रलक्षी हवी, नाही तर समग्रलक्षी दृष्टीच्या अभावी केवळ काही तथ्यांचा पाठपुरावा होऊन बाकीची अलक्षित राहण्याचा धोका संभवेल.''[३] वाङ्मयेतिहासकारांनी समग्रलक्षी दृष्टिकोन ठेवला पाहिजे. नाहीतर ते लेखन फक्त एकांगी होईल आणि अनेक गोष्टींवर अन्याय होईल. याची अनेक उदाहरणे आपल्याला वाङ्मयेतिहासात दिसतात. मोरोपंत समाजविन्मुख कवी होते. संत तुकारामांनी काव्याचे ओज कमी केले. महात्मा फुले हे साहित्यिकच नाहीत. अशी अनेक उदाहरणे आपणास त्यात दिसतात. म्हणजे एकच दृष्टी आपल्या लेखनात असली, तरी ती साहित्याच्या तेवढ्या अंगाचा परिचय करून देण्यासाठी ठीक आहे. परंतु त्याची दुसरी बाजू समोर आणण्यासाठी इतरही दृष्टिकोनांचा विचार वाङ्मयेतिहासकारांनी करायला हवा.

पुढील ज्या लेखकांनी वाङ्मयेतिहासलेखन केले आहे, हे सर्व लेखक वेगवेगळ्या कालखंडांतील व काही समकालीन आहेत. तसेच काही संपादक आहेत. जरी हे वाङ्मयेतिहासकार एका कालखंडातील असले, तरी प्रत्येक व्यक्तीचा एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा असा दृष्टिकोन असतो, त्यानुसार तो त्या गोष्टीकडे पाहत असतो. मध्ययुगीन मराठी वाङ्मय हे एकच आहे. परंतु त्याच्या अनेक अंगांनी अनेकांनी अभ्यास केला आहे; लेखन केले आहे. असे झाल्याशिवाय त्याच्या वेगवेगळ्या बाजू आपल्यासमोर येणार नाहीत.

वाङ्मयाचा इतिहास लिहिणारांत कोणी व्यापारी, वारकरी, प्रवचनकार, तर कोणी वाङ्मयाचा व्यासंगी प्राध्यापक, तर कोणी कर्तव्यापोटी जबाबदारी घेऊन झालेला संपादक आहे. यांनी आपापल्या दृष्टिकोनातून वाङ्मयेतिहासलेखन केलेले दिसते.

त्यांच्या लेखनात कोठे काळाच्या धारणा दिसतात, तर कधी कोणाची गरज दिसते. तर कधी सामाजिक दृष्टिकोन दिसतो. सामाजिक दृष्टिकोनातून वाङ्मयेतिहासलेखनावर द. दि. पुंडे म्हणतात की, ''वाङ्मयेतिहासकाराला शुद्ध वाङ्मयीन दृष्टिकोन स्वीकारून चालणार नाही. कलासंबंधी धारणा—प्रेरणांबरोबरच त्याला वाङ्मयीन निमिर्तीमागील सामाजिक धारणाप्रेरणांचाही ऊहापोह करणे आवश्यक ठरते. येथे इतकेच म्हणता येईल, सामाजिक दृष्टिकोन स्वीकारताना वाङ्मयेतिहासाचे रूप समाजेतिहासाचे होणार नाही, इतकीच खबरदारी वाङ्मयेतिहासकारांनी घ्यावयाची आहे.''[४] म्हणजे त्याने वाङ्मयालाच आधार मानून वाङ्मयेतिहासाचे लेखन करावे असे द. दि. पुंडे म्हणतात.

मराठी वाङ्मयेतिहासाची सांकल्पनिक पार्श्वभूमी पाहिली तर ती पश्चिमात्य वाङ्मयेतिहासावर आधारित आहे. यावर सुजित मुखर्जी म्हणतात ''परिणामी, भारतात (१९४७ पर्यंत तरी) इंग्रजी वाङ्मयेतिहासाच्या वाचनामागे वाङ्मयेतिहासाच्या ज्या संकल्पना होत्या, त्यांचेच अधिराज्य मराठी, बंगाली, हिंदी, तामीळ भाषांच्या लिहिल्या गेलेल्या वाङ्मयेतिहासामागील संकल्पनांवर अबाधित राहिले.''[५] म्हणजे आंग्लकाळात आपल्याकडे ब्रिटिशांनी शिक्षण आणले. त्या शिक्षणात त्यांच्याकडील सिद्धांत आणि संकल्पना आणल्या. त्याच आपल्याकडील विचारवंतांनी उचलल्या. वाङ्मयेतिहासलेखनाच्या बाबतीत तसेच झाले. इंग्रजी वाङ्मयेतिहासाची संकल्पना मराठीच नाही तर सर्वच भारतीय इतिहासकारांनी उचलली. त्यामुळे बराच गोंधळ झालेला दिसतो. एकूणच तत्कालीन परिस्थिती आणि लेखकाची विचारशक्ती याचा प्रभाव वाङ्मयेतिहासावर पडलेला दिसतो.

तसेच तो लेखक ज्या काळात वावरत असेल, त्याचाही प्रभाव त्यावर असतो. द.दि. पुंडे म्हणातात ''आपल्या वर्तमानकालीन जाणिवा, संवेदना जशा असतील तशा स्वरूपाचा वाङ्मयेतिहास आपल्याला हवाहवासा वाटेल''[६] वाङ्मयेतिहासाची संकल्पना कशीही असूद्या, वाङ्मयेतिहासलेखक हा ज्या विचारसरणीचा असेल, त्याने जो दृष्टिकोन ठरविलेला असेल, त्याची जी भूमिका असेल, त्यानुसारच तो लेखन करेल.

मध्ययुगीन वाङ्मयाबद्दलही काहीसा असाच प्रकार घडतो. हे वाङ्मय मध्ययुगीन काळातील, त्याचे लेखन अर्वाचीन काळात, तर काही स्वातंत्र्योत्तर काळातील. त्यामुळे लेखक ज्या काळात वावरत आहे, त्या काळातील धारणा, प्रेरणा व प्रवाह समोर ठेवून या वाङ्मयाचे लेखन व समीक्षण त्यांच्याकडून होत असेल. यावरून असे म्हणता येईल की मध्ययुगीन वाङ्मयेतिहासलेखनावर काहीसा अन्याय करण्यासारखे आहे. परंतु दुसऱ्या अंगाने विचार करता, असा परिस्थितिनिरपेक्ष विचार करून मध्ययुगीन वाङ्मयाचा विचार कोण करू शकतो? असा विचारही झाला असेल, परंतु तो निखळ व निरपेक्ष असेलच याची शाश्वती देता येणार नाही. कोणत्याही गोष्टीवर कशाचा तरी प्रभाव असतो. त्यानुसार मध्ययुगीन वाङ्मयेतिहासावर लेखकांच्या विचारांचा व ज्या काळात हे वाङ्मयेतिहास लिहिले गेले, त्या काळाचा स्पष्ट प्रभाव जाणवतो.

वि.ल.भावे यांच्या वाङ्मयेतिहासावर पारतंत्र्यातील परिस्थितीचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे त्यांचा राष्ट्रवादी दृष्टिकोन निर्माण झाला. ल.रा. पांगारकर हे वारकरी व कीर्तनकार होते. त्यामुळे त्यांच्या लेखनात भक्तिभाव व सश्रद्धता डोकावते. म.सा.प. ने वाङ्मयाचा आराखडा बनवला. त्यानुसार वाङ्मयेतिहासलेखन केले. परंतु त्यावर वेगवेगळ्या संपादकांचा ठसा दिसतो. त्यामुळे त्यांचे वेगळेपण जाणवते. शेणोलीकर, नासिराबादकर यांच्या वाङ्मयेतिहास लिहिण्याात अध्यापक व विद्यार्थी यांची गरज होती. म्हणजे कोणाचे व्यक्तिमत्त्व, कोणाचा त्यातील वेगळेपणा, तर कोणी तत्कालीन परिस्थिती यामुळेच वाङ्मयेतिहासलेखन केलेले दिसते.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 2

## संदर्भ


१. द. दि. पुंडे, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जानेवारी ते मार्च, २०१०. अंक. क्र. ३३२.पृ. २१

२. द. दि. पुंडे संपा., वाङ्मयेतिहास संकल्पना, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००५, पृ.क्र. २००२.

३. तत्रैव पृ. १४.

४. तत्रैव पृ. १४.

५. तत्रैव पृ. १०९.

६. द. दि. पुंडे, वाङ्मयेतिहास आठ निबंध, प्रतिमा प्रकाशन २६ ऑक्टोबर २००३, पृ. १९.